14/2024

0058162

FORM-1A

N.C.R.B.
I.I.F.-I

# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

**फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)**

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि., मुंबई पहिली खबर क्र. FIR No. 14 वर्ष Year 2024 दिनांक Date 6/5/2024

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, कलमे Sections 7
   (ii) अधिनियम Act ......, कलमे Sections ......
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ......

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day 12/4/2024 तारीख पासून Date from 1.5/4/2024 वेळ Time 21:00 तारीख पर्यंत Date to ते 21:00 वा पर्यंत, वेळ Time ......
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 ✓(8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 12/4/2024 वेळ Time 17:30 वा
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 29/2024 तारीख Date 6/5/2024 वेळ Time 16:10 वा.

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral ......

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. उत्तरेस ! किमी / चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O.P. Name and No. ......
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name सर्बियन स्टोर अँड रेस्टॉरंट, ठिकाणाचे नंबर No. if any ...... गल्ली Ward शॉप नं. 1, रस्त्याचे नाव Name of road ने. 24, फि. रोड 1,
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place रामोड्या मैदान, गाव Village ...... पोस्ट Post सेंचुरी बाजार, तालुका Taluka वरळी जिल्हा Dist. मुंबई 30, राज्य State ......
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ...... तालुका Taluka ......, जिल्हा Dist. ......, राज्य State ......

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name श्री महेश पारसनाथ नायक (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name श्री पारसनाथ नायक
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 39 वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 8898705445
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ...... दिल्याचा दिनांक Date of Issue ...... दिल्याचे ठिकाण Place of Issue ...... (f) व्यवसाय Occupation नोकरी
   (g) धर्म Religion हिंदू जात Caste ......, जनजात Sub-Caste ......
   (h) पत्ता Address : गल्ली / सर्व्हे नं. Ward ...... घर / नाव नं. House/Name No. रूम नं. 5, पहिला मजला, फोन / मो. नं. Phone/M. No. ...... पॅन नं. PAN No. 15 ...... वोटर्स नं. Card No. डिसुझा हाऊस,
   रस्त्याचे नाव Road वरळी जवळचे प्रसिद्ध ठिकाण (Nearest identifiable place कोळीवाडा वरळी गाव Village मुंबई. 30 पोस्ट Post ...... पो. स्टे. P. Stn. ......
   तालुका Taluka ...... जिल्हा Dist. ...... राज्य State ...... सध्याचा पत्ता Present Address ......

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)
   पोलीस उपनिरीक्षक ईश्वर सुरेश जगदाळे, दादर पोलीस ठाणे, मुंबई



Scanned with OKEN Scanner

वरील फिर्यादी नामे श्री महेश पारसनाथ नाविक वय 39 वर्ष धंदा - नोकरी रा.ठी. रुम नं 5, पहिला मजला, 15 A, डिसुसा हाऊस, वरळी कोळीवाडा वरळी मुंबई 30 यांच्या सांगण्यावर स्वतंत्र कागदावर टंकलिखीत केलेला जबाब हाच नजर गुन्ह्याच्या प्रथम खबरी अहवाल संबोधण्यात यावा.

समक्ष

(signature)

(शैला ओरडे)

सहाय्यक पोलीस आयुक्त

आ. गु. वि. मुंबई.

(signature)

३७
पृ

जवाब दिनांक ०६/०५/२०२४

श्री. महेश पारसनाथ नाविक, वय ३९ वर्षे, धंदा – नोकरी, राठि – रूम नंबर ०५, पहिला मजला, १५ ए, डिसुझा हाऊस, वरळी कोळीवाडा, वरळी, मुंबई ४०००३०. मोबाईल नंबर ८८९८७०४४४५

---

मी वरीलप्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर मागील १५ व ार्षापासून माझे परिवारासह राहावयास आहे. मी एशिअन स्टोअर्स ॲन्ड रेस्टॉरंन्ट, शॉप नं. ०१ ते ०४, बिल्डींग नं. ०१, रामोडिया मेन्सन, सेन्चुरी बाजार, वरळी, मुंबई ३० या रेस्टॉरंन्टमध्ये माहे जून २०२३ पासून मॅनेजर या पदावेर काम करीत असून त्यामधून मिळणाऱ्या मिळकतीवर माझे परिवाराचा उदरनिर्वाह चालतो.

मी काम करीत असलेल्या एशिअन स्टोअर्स ॲन्ड रेस्टॉरंन्टचे मुळ मालक श्रीमती अमूयान सीमन बेहराम या आहेत. तसेच रेस्टॉरंन्टची शॉप नं. ०१ ते ०४, बिल्डींग नं. ०१, रामोडिया मेन्सन, सेन्चुरी बाजार, वरळी, मुंबई ३० या जागेचे मुळ मालक श्री. हुसेन रामोडीया हे असून त्यांनी सदरची जागा हि एशिअन स्टोअर्स ॲन्ड रेस्टॉरंन्टला पगडी पध्दतीने कायमस्वरूपी भाडे तत्वावर दिलेली आहे. सदर रेस्टॉरंन्ट चालवण्यासाठी श्रीमती अमूयान सीमन बेहराम यांनी त्यांचे भाऊ श्री कैखुशरू सुरान व मला माहे नोव्हेंबर २०२३ मध्ये पॉवर ऑफ ॲटर्नी व मॅनेजमेंन्ट ॲग्रीमेंन्ट दिले असून सध्या सदर रेस्टॉरंन्ट हे श्री कैखुशरू सुरान चालवित असून मी सदर रेस्टॉरंन्टमध्ये मॅनेजर पदावर काम करीत आहे. वर नमुद जागेच्या मालकी हक्क वादावरून दादर पोलीस ठाणेस आमचे शॉपचे मुळ मालकाची मुले श्री कामरोन अमुयोन, श्री सोराब अमुयोन व नातेवाईक श्री शेहजाद अमुयोन यांचेविरूध्द गुरक्र. १०४/२०२४ कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद असून सदरचा गुन्हा तपासाधिन आहे. तसेच सदरबाबत मा. न्यायालयात देखील दिवाणी स्वरूपाचा दावा दाखल असून सदरचे प्रकरण अदयापपर्यंत प्रलंबित आहे.

दिनांक १३/०३/२०२४ रोजी माझे विरूध्द व एशिअन स्टोअर्स ॲन्ड रेस्टॉरंन्टचे मुळ मालक श्रीमती अमूयान सीमन बेहराम यांचे भाऊ श्री कैखुशरू सुरान यांचेविरूध्द श्री जॉन थॉमस बारबोजा यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दादर पोलीस ठाणेस पोलीस उप निरीक्षक श्री ईश्वर जगदाळे यांनी गुरक्र. १२७/२०२४ कलम ३७९, ४५४, ५०६, ३४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाच्या अनुषंगाने गुन्हयाचे तपासी अधिकारी लोकसेवक पोलीस उप निरीक्षक ईश्वर जगदाळे यांनी दिनांक १४/०३/२०२४ रोजी माझे मोबाईल क्रमांक ८८९८७०४४४५ वर व्हॉटस्‌अप व्दारे कलम ४१(अ) फौप्रसं. ची नोटीस पाठविली. त्यावेळी मला माझेविरूध्द वरीलप्रमाणे गुन्हा दाखल असल्याचे समजले. त्यानंतर मी वकिलांच्या सल्ल्याने अटकपूर्व जामिनाकरीता मा. सत्र न्यायालयात अर्ज केला असता, दिनांक २६/०३/२०२४ रोजी मला मा. सत्र न्यायालयाने अटकपूर्व जामिन मंजूर करून दिनांक ०२/०४/२०२४, ०४/०४/२०२४, ०६/०४/२०२४ व ०८/०४/२०२४ या दिवशी व जेव्हा जेव्हा तपासी अधिकारी गुन्हयाच्या तपासाकरीता पोलीस ठाणेस बोलावतील त्या वेळेस तपासी अधिकारी यांचेकडे हजर राहून मुळ कागदपत्रे सादर करण्याबाबत आदेश दिले होते. त्यानंतर मी वर नमुद तारखांना गुन्हयाच्या तपासाकामी दादर पोलीस ठाणेस तपासी अधिकारी पोउपनि. श्री जगदाळे यांचेकडे हजर राहीलो.

दिनांक १०/०४/२०२४ रोजी सायंकाळी ०७.३० वा. लोकसेवक श्री जगदाळे हे जेवणाकरीता मी काम करीत असलेल्या एशिअन रेस्टॉरंटमध्ये आले असता, त्यांनी माझी भेट घेवून माझेसोबत माझेविरूध्द दादर पोलीस ठाणेस दाखल असलेल्या गुरक्र. १२७/२०२४ याबाबत चर्चा करून "तुम्हाला तपासात व चार्जशीट

कृपया मागे पहा...

Scanned with OKEN Scanner

दाखल करण्यास मदत करतो, तुम्ही मला रूपये ५०,०००/– इतकी रक्कम द्या'' असे बोलून माझेकडे लाचेची मागणी केली असता मी एवढी रक्कम देणे शक्य नसल्याचे सांगितले असता, त्यांनी रूपये ४०,०००/– इतकी रक्कम घेण्याचे मान्य केले. त्यावेळी मी याबाबत मालकांना विचारून तुम्हाला कळवितो असे सांगितले. मला लोकसेवक श्री. जगदाळे यांना लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने मी दिनांक १२/०४/२०२४ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे येवून लेखी तक्रार दिली.

मी लाप्रवि कार्यालयात केलेल्या लेखी तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १२/०४/२०२४ रोजी दोन शासकीय पंचासमक्ष लोकसेवक श्री जगदाळे यांना मी काम करीत असलेल्या एशिअन रेस्टॉरन्टमध्ये समक्ष भेट घेवुन पडताळणी करण्यात आली. समक्ष भेटी दरम्यान लोकसेवक श्री जगदाळे यांनी माझेविरूध्द दाखल असलेल्या गुन्हयाच्या चार्जशिट बाबत चर्चा केली व त्यादरम्यान मी लोकसेवकास ''काही तरी कमी करा'' अशी विनंती केली असता, लोकसेवकाने बाजुस बसलेल्या पंचाकडे बघुन मला हॉटेलच्या बाहेर साईडला घेवुन गेले तेथे लोकसेवक मला बोलले कि, ''साईडला ये म्हणजे तुला माहिती काय... सहकार्य करा म्हणजे काय तुला बोललो ना मी काल...'' त्यावर मी त्यांना '' पण जे तुम्ही बोलताय ती जास्त अमाउंट होतीय सायब... '' असे बोललो असता, लोकसेवक मला '' दे तुझ्याकडे जे हाईल ती दे बाबा काय प्रॉब्लेम नाय..'' असे बोलले त्यावर मी लोकसेवक यांना '' समजा आता किती चाळीस हजार बोललात... आपल्याला चाळीस हजार नाय होणार.'' असे म्हणालो असता, लोकसेवक यांनी मला '' हा ठिक आहे नको देउ तेवढे माझे काय.. माझ बघ आणि ते संपव...'' असे म्हणाले म्हणून मी लोकसेवक यांना '' तुम्हाला किती देउ तुमचे...'' असे विचारले असता लोकसेवक मला **''तुला जे स्वखुशी वाटतय ते देउन टाक''...** असे म्हणाले. त्यावर मी म्हणालो ''तुम्ही तुमच्या तोंडाने सांगा किती देवु?'' तेव्हा लोकसेवक म्हणाले **''तीस दे ना'... तीस देवुन टाक..** . त्यावेळी मी त्यांचेकडे एक दिवसाचा टाईम मागीतला असता, लोकसेवक म्हणाले **''जाउ दे... आज काय होणार आहे ती सांगुन दे... विषय संपवून टाक...** असे बोलून त्यांनी माझेकडे तडजोडी अंती रूपये ३०,०००/– इतक्या लाचेच्या रक्कमेची मागणी करुन सदरची लाच स्विकारण्याचे मान्य केले आहे.

त्यानंतर लोकसेवक श्री जगदाळे यांनी माझेकडे लाचेची रक्कम स्विकारण्याबाबत कोणताही संपर्क न केल्याने दिनांक १५/०४/२०२४ रोजी मी लाप्रवि कार्यालयात सपोआ कोरडे यांना भेटलो. त्यावर सपोआ कोरडे यांनी सदर दिवशी मला पंचासोबत लोकसेवक यांचे कार्यालयात भेटण्याकरीता पाठवून सापळा कारवाई करणार असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे दिनांक १५/०४/२०२४ रोजी मी माझे बचतीमधील भारतीय चलनाच्या रुपये ५००/– दराच्या ६० चलनी नोटा असे एकूण रूपये ३०,०००/– लाचेची रक्कम म्हणुन सपोआ शैला कोरडे यांचेकडे वापरण्यासाठी समक्ष हजर केले. सदर लाचेच्या रक्कमेस ॲन्थ्रोसिन पावडर लावुन माझे नेसणीच्या पॅन्टच्या डाव्या खिशात ठेवल्या. सापळा पुर्व कारवाई पुर्ण करून पंच क्र. ०२ श्री पवार यांचे सोबत लोकसेवक यांचे कार्यालयात सापळा पथकासह भेटण्याकरीता गेलो असता, सदर ठिकाणी लोकसेवक कार्यालयात हजर नव्हते म्हणून मी माझे मोबाईल नंबर ८८९८७०४४४५ वरून लोकसेवक श्री जगदाळे यांचे मोबाईल नंबर ९८९०७०३९१४ वर संपर्क केला असता, लोकसेवकाचा मोबाईल फोन स्विच ऑफ असल्याचे मला समजले. त्यानंतर पुन्हा मी लोकसेवकास कॉल केला असता, त्यांनी माझा कॉल उचलला नाही. म्हणुन मी लोकसेवकाच्या कार्यालयात आजुबाजूस असलेल्या कक्षामध्ये जावुन बघीतले परंतु लोकसेवक दिसुन आले नाही म्हणुन मी व पंच असे परत आलो.



Scanned with OKEN Scanner

दिनांक ०६/०५/२०२४ रोजीचा श्री महेश नाविक यांचा फिर्यादी जबाब पुढे सुरू....

सदर दिवशी माझी लोकसेवकासोबत भेट झाली नाही तसेच लोकसेवक माझा कॉल उचलत नसल्याने मी सापळा पथकासह लाप्रवि कार्यालयात परत आलो. लाप्रवि कार्यालयात परत आल्यानंतर लोकसेवकाच्या फोन कॉलची वाट पाहिली असता, बऱ्याच वेळे पर्यन्त लोकसेवकाचा कॉल आला नाही. म्हणुन सपोआ कोरडे यांचे सुचनेप्रमाणे मी पुन्हा लोकसेवक यांचे मोबाईलवर कॉल केला असता, तेव्हा देखिल लोकसेवकाने माझा कॉल उचलला नाही.

त्यानंतर मी माझे नातेवाईकांच्या लग्नाकरीता तसेच त्या दरम्यान माझे वडीलांची तब्येत देखील ठिक नसल्याने मी माझे उत्तरप्रदेश येथील गावी गेलो होतो. या कालावधीत देखील मला लोकसेवक यांनी लाचेच्या रक्कमेकरीता माझेशी कोणत्याही प्रकारे संपर्क साधलेला नसून भविष्यात देखील लोकसेवक श्री जगदाळे हे लाचेची रक्कम स्विकारण्याची शक्यता मला वाटत नसल्याने मी आज रोजी लाप्रवि कार्यालय येथे फिर्याद देण्याकरीता हजर आहे.

तरी दिनांक १२/०४/२०२४ रोजी शासकिय पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणीमध्ये लोकसेवक श्री जगदाळे यांनी माझेकडे, माझेविरूध्द दादर पोलीस ठाणेस दाखल असलेल्या गुन्हयाच्या तपासात मदत करण्याकरीता व गुन्हयाचे चार्जशिट लवकर कोर्टामध्ये दाखल करण्याकरीता प्रथम रूपये ५०,०००/— इतक्या लाचेची मागणी केली. त्यावेळी मी एवढी रक्कम देणे शक्य नसल्याचे सांगितले असता, त्यांनी रूपये ४०,०००/— इतकी रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. त्यानंतर दिनांक १२/०४/२०२४ रोजीच्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्री जगदाळे यांनी माझेकडे तडजोडी अंती रूपये ३०,०००/— इतक्या लाचेची मागणी करून ती स्विकारण्याचे मान्य करून गैरलाभ मिळविण्याचा प्रयत्न केला म्हणून माझी लोकसेवक पोलीस उप निरीक्षक श्री ईश्वर जगदाळे, नेमणूक — दादर पोलीस ठाणे, मुंबई यांच्याविरूध्द कायदेशिर फिर्याद आहे.

माझा वर नमुद जबाब मराठीत संगणकीकृत केला असून तो मला मराठीतून वाचून व समाजावून सांगितला असून तो माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष

(शैला कोरडे)
सहायक पोलीस आयुक्त ,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई



Scanned with OKEN Scanner

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ......... पडताळणी अंती .........

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

.........................................................................................................

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य रु. 30,000/- .........

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक .........

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

खालील नमुद ता. वेळी व ठिकाणी यातील कॉ.क्र. 7 मधील आरोपी लोकसेवक याने
फि. यांच्याविरुद्ध दादर पोलीस ठाणेस दाखल असलेल्या गुन्ह्याला तपासात मदत करण्या-
करिता व गुन्ह्याचे चार्जशीट लवकर कोर्टात दाखल करण्याकरिता प्रथम रु. 50,000/- व नंतर
मागणी केली. त्यावेळी फि. ने एवढी रक्कम देणे शक्य नसल्याचे सांगितले असता आरोपी लोकसेवक
याने रु. 40,000/- इतकी रक्कम स्विकारण्यास मान्य केले त्यानंतर पडताळणी कारवाई दरम्यान
आरोपी लोकसेवक याने फि. कडे तडजोडीअंती रु. 30,000/- इतक्या लाचेची मागणी करून
ती स्विकारण्याचे मान्य केले म्हणून भ्र. प्र. अधिनियम 1988 कलम 7 अन्वये गुन्हा नोंद

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

......... सपोआ शैला कोरडे .........

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

.........................................................................................................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन........., जिल्हा........., राज्य.........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)......... Rank......... No......... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to......... (3) Transferred to P. S. ......... District......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ......... शैला कोरडे .........

पदनाम Rank......... स.पो.आ. .........

तपासिक अं. चा कोड क्र. .........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख.........

1. Date and time of submitted to the Court.

Posting

Code No. of I. O. .........

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत, | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer). | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Scanned with OKEN Scanner